**CNR No. :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी ९० वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १६ च्या कायदेशीर वारसांना अभिलेखासदरी घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १६) श्रीम. सिताबाई रामा ठाकुर ही दि.१२/०७/२०२३ रोजी मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र. १६ हिचे वारस मुलगे प्रतिवादी क्र. १४ व प्रतिवादी क्र. १५ हेच आहेत. सदर मयत प्रतिवादी क्र. १६ हिचे वारस हे यापूर्वीच सदर दाव्यात सामील आहेत. सदर दाव्याच्या न्यायपुर्ततेकामी प्रतिवादी क्र. १६ चे नावासमोर मयत असे नमुद करुन प्रतिवादी क्र. १६ हिचे नाव कमी करण्याकामी दि.१३/०७/२०२३ पासून ४ महिने १६ दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब, सदरचा विलंब माफ होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी यांना अर्जाकामी म्हणणे सादर करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत सादर न केलेने दि.०९/०७/२०२४ च्या आदेशान्वये त्यांच्या विरुद्ध सदरचा अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

०४. अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १६ चे वारस अभिलेखावर येणे

आवश्यक आहे. वादी यांनी वारस अभिलेखावर आणण्यासाठी विलंब केलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र. १६ यांचे वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती करावी लागणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.04.08 16:15:42 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (आर. जी. कुंभार)
दिनांक – ०८.०४.२०२५. जादा सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
दोडामार्ग.